**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक**
**(विकास आस्थापना शाखा)**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दूरध्वनी क्र. 0253-2468650** **E-mail- crunsk-divcom@mah.gov.in**

---

क्र. विआशा/पंरा/जिपनि/8101575/2025 दि.स्वाक्षरी खाली नमूद आहे.

प्रति,

1.जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, धुळे,जळगाव,अहिल्यानगर,नंदुरबार.

2. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार.

विषय- महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूका घेणे) नियम, 1962 आणि महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूका घेणे) नियम,1962 मधील अपिल विषयक तरतूद रद्द करण्याबाबत

संदर्भ- सह सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.जिपनि-2025/ प्र.क्र.158/पं.रा.-2 दि.30.12.2025

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने सूचित करण्यात येते की, सह सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचेकडील संदर्भीय पत्राची प्रत आपणास देखील देण्यात आलेली आहे.

सदर पत्रान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूका घेणे) नियम,1962 मधील नियम 20 तसेच महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूका घेणे) नियम,1962 मधील नियम 19-अ मध्ये असलेली अपिलांची तरतूद रद्द करण्यासंदर्भात आवश्यक ती सुधारणा करण्यात आली असून ते पहावे. (सोबत अध्यादेशाची मराठी व इंग्रजी प्रत जोडली आहे.)

सदर अधिसूचनांद्वारे करण्यात आलेल्या सुधारणा आपल्या अधिपत्याखालील संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात तसेच त्याअनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सोबत- अध्यादेशाची मराठी व इंग्रजी प्रत.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 05-01-2026 15:22:06

**(डॉ.प्रवीण गेडाम)**
**विभागीय आयुक्त नाशिक.**

प्रत- 1.सचिव राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-32
2.सह सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, 25 मर्झबान पथ, मुंबई-1

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४
ई मेल: sopr२.rdd-mh@nic.in

क्रमांक:जिपनि-२०२५/प्र.क्र.१५८/पं.रा.-२

दिनांक :३०/१२/२०२५

प्रति,

(१) सर्व विभागीय आयुक्त,
(२) सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळून)
(३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूका घेणे) नियम, १९६२ आणि महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूका घेणे) नियम, १९६२ मधील अपिल विषयक तरतूद रद्द करण्याबाबत.

संदर्भ:-(१)राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे विभागास प्राप्त झालेले क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४५/का-७, दिनांक ०९/१२/२०२५ चे पत्र.

(२) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ४६७, अधिसूचना, दिनांक २७ डिसेंबर, २०२५ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ४६८, अधिसूचना, दिनांक २७ डिसेंबर, २०२५

महोदय/महोदया,

संदर्भाधीन क्रमांक २ च्या अधिसूचनांन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूका घेणे) नियम, १९६२ मधील नियम २० तसेच महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूका घेणे) नियम, १९६२ मधील नियम १९-अ मध्ये असलेली अपिलांची तरतूद रद्द करण्यासंदर्भात आवश्यक ती सुधारणा करण्यात आली असून त्याचे कृपया अवलोकन व्हावे. (सोबत अधिसूचनांच्या मराठी व इंग्रजी प्रती जोडल्या आहेत.)

२. आपणांस सूचित करण्यात येते की, सदर अधिसूचनांद्वारे करण्यात आलेल्या सुधारणा आपल्या अधिपत्याखालील संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात तसेच त्याअनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सहपत्र:- अधिसूचनांच्या मराठी व इंग्रजी प्रती.

(व. मुं. भरोसे)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :- सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:
प्रत:- कार्यासन पंचायत राज-२, निवडनस्ती.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १८५] शनिवार, डिसेंबर २७, २०२५/ पौष ६, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४६७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
दिनांक २७ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक जिपनि-२०२५/प्र.क्र.१५८/पंरा.२.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणुकीच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियमांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट वाटते ;

आणि ज्याअर्थी, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी या नियमांची पूर्वप्रसिद्धीसाठीची शर्त काढून टाकणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम २७४ च्या पोट-कलम (२) चे खंड (एक) व (तीन), तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (२) आणि कलम १४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांशी विचारविनिमय करून, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये आणखी सुधारणा करून, याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूक घेणे) (दुसरी सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणण्यात येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ (यापुढे "मूळ नियम" असे संबोधण्यात येईल) मधील नियम १९ च्या, उप नियम (८) मधील "नियम २० च्या उपबंधास अधीन राहून," हे शब्द वगळण्यात येतील.

३. मूळ नियमातील नियम २० वगळण्यात येईल.

४. मूळ नियमातील नियम २१ च्या, उप नियम (१) ऐवजी पुढील उप नियम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१) कोणत्याही उमेदवारास, नियम १९(८) अनुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधिन केलेल्या लेखी नोटिसीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल, मात्र तो दिवस सरकारी सुटीचा दिवस असल्यास त्याच्या लगतच्या सरकारी सुटीच्या नसलेल्या दिवशी नामनिर्देशन मागे घेता येईल."

५. मूळ नियमांना जोडलेला नमूना-३ वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सहसचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhawan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001,
Dated the 27th December, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No.ZPE-2025/C.R.158/PR-2.- Whereas, it is expedient further to amend the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions And Conduct of Election) Rules, 1962 for the purpose of conduct of election of Zilla Parishads ;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action; and for that purpose to dispense with the condition of previous publication thereof.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (i) and (iii) of sub-section (*2*) of section 274 read with sub-section (*2*) of section 9 and section 14 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, in consultation with the State Election Commissioner, makes the following rules further to amend the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions And Conduct of Election) Rules, 1962 as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Election) (Second Amendment) Rules, 2025.

2. In rule 19 of the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Election) Rules, 1962 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub rule (8), the words "subject to the provisions of Rule 20," shall be deleted.

3. Rule 20 of the principal Rules shall be deleted.

4. In rule 21 of the principal Rules, for sub rule (1), the following sub rule shall be substituted, namely :—

"(*1*) Any candidate may withdraw his candidature by notice in writing subscribed by him and delivered to the Returning Officer within three days, after the affixing of a list of candidates on the notice board, whose nomination have been accepted under sub rule (8) of rule 19 and if third day is a public holiday, the withdrawal may be permitted on the next succeeding day which is not a public holiday.".

5. Form III appended to the principal Rules shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. M. BHAROSE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १८५(२)] शनिवार, डिसेंबर २७, २०२५/पौष ६, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४६८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,

मुंबई ४०० ००१, दिनांक २७ डिसेंबर २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक जिपनि-२०२५/प्र.क्र.१५८/पंरा.२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियमांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट वाटते ;

आणि ज्याअर्थी, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी या नियमांची पूर्वप्रसिद्धीसाठीची शर्त काढून टाकणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम २७४ च्या पोट-कलम (२) चे खंड (बारा) व (तेरा), तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ५७ च्या पोट-कलम (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांशी विचारविनिमय करून, महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये आणखी सुधारणा करून, याद्वारे पुढील नियम करीत आहे .—

**१.** या नियमांना महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) (दुसरी सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणण्यात येईल.

**२.** महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणुका घेणे) नियम, १९६२ (यापुढे " मूळ नियम " असे संबोधण्यात येईल) मधील नियम १९ च्या, उप-नियम (७) मधील " नियम १९-अ च्या उपबंधास अधीन राहून," हे शब्द वगळण्यात येतील.

**३.** मूळ नियमातील नियम १९-अ वगळण्यात येईल.

४. मूळ नियमातील नियम २० च्या, उप-नियम (१) ऐवजी पुढील उप-नियम समाविष्ट करण्यात येईल .—

"(१) कोणत्याही उमेदवारास, नियम १९ (७) अनुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलेल्या लेखी नोटिसीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल, मात्र तो दिवस सरकारी सुटीचा दिवस असल्यास त्याच्या लगतच्या सरकारी सुटीच्या नसलेल्या दिवशी नामनिर्देशन मागे घेता येईल."

५. मूळ नियमांना जोडलेला नमुना २-क वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhawan, 25 Marzban Path, Fort,
Mumbai 400 001, dated the 27th December 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPE-2025/C.R.158/PR-2.—Whereas, it is expedient further to amend the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) Rules, 1962 for the purpose of conduct of election of Panchayat Samitis ;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action ; and for that purpose to dispense with the condition of previous publication thereof.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*xii*) and (*xiii*) of sub-section (*2*) of section 274 read with sub-section (*3*) of section 57 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, in consultation with the State Election Commissioner, makes the following rules further to amend the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) Rules, 1962 as follows, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) (Second Amendment) Rules, 2025.

**2.** In rule 19 of the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) Rules, 1962 (hereinafter referred to as " the Principal Rules "), in sub-rule (7), the words "subject to the provisions of Rule 19-A," shall be deleted.

**3.** Rule 19-A of the principal Rules shall be deleted.

**4.** In rule 20 of the principal Rules for sub-rule (1), the following sub-rule shall be substituted, namely :—

" (*1*) Any candidate may withdraw his candidature by notice in writing subscribed by him and delivered to the Returning Officer within three days, after the affixing of a list of candidates on the notice board, whose nomination have been accepted under sub-rule (7) of rule 19 and if third day is a public holiday, the withdrawal may be permitted on the next succeeding day which is not a public holiday.".

**5.** Form II-C appended to the principal Rules shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. M. BHAROSE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.